करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक - १३१

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक: साशा कार्या/ब-५/आदेश/डॉक्टर करोना-२०२० दिनांक :२७/०३/२०२०.

वाचले:- १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
४. मा.आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील जा.क्र.मत्स्य/सा/१४/२०२० दि. २६/०३/२०२०
५. साथ रोग अधिनियम १८९७.

---

**आदेश,**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २(अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

उपोद्घातातील अनुक्रमांक ५ नुसार शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.२ अन्वये अधिसुचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

उपोद्घातातील अनुक्रमांक ४ नुसार, करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्यातील आंतरराज्य तसेच जिल्हयाअंतर्गत प्रवेश बंद करण्यात आले असल्याने मत्स्यशेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे मत्स्य व मत्स्यखाद्य यांची आत्यावश्यक वस्तू (Essential Commodities) म्हणून गणना करुन त्यांची वाहतूक सुरु करण्यास मान्यता देणेबाबत कळविले आहे.

त्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.४ मध्ये नमूद दिलेल्या निर्देश विचारात घेवून उपोद्घातांतील अ.क्र.२ अधिसुचनेतील नियम १० मधील तरतूदीनुसार मी, श्रीम.निधी चौधरी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मत्स्य व मत्स्यखाद्य यांची आत्यावश्यक वस्तू (Essential Commodities) म्हणून गणना करुन त्यांची वाहतूक सुरु ठेवण्याबाबत आदेशीत करीत आहे.

सदरच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पुर्तता अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी RAIGAD ALIBAG

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड अलिबाग**

प्रत :- मा.प्रधान सचिव, आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांना माहीतीसाठी.
प्रत :- मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहीतीसाठी.
प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांना माहितीसाठी.
प्रत :- पोलीस अधिक्षक रायगड अलिबाग यांना माहीतीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- पोलीस आयुक्त नवी मुंबई यांना माहीतीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- आयुक्त, मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र राज्य मुंबई
प्रत :- सहा.आयुक्त, मत्स्यव्यवसाय रायगड अलिबाग
प्रत :- उपविभागीय अधिकारी, (सर्व) यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत :- तहसिलदार (सर्व)
२/- सदर आदेशाची अमंलबजावणी तात्काळ करुन अहवाल सादर करावा.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड अलिबाग**

Scanned with CamScanner